# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

**दिनांक १४/०६/२०२२ (मंगळवार)**

**(सकाळ)**

---

**जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद**

**पो.स्टे. मौदा**:— अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील मौदा वडोदा शिवार मुरली ॲग्रो कंपनी येथे दिनांक १३.०६.२२ चे २३.३० वा. ते १४.०६.२२ चे ०००.३० वा. दरम्यान मौदा पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन मौदा पोलीस पथकाने तात्काळ मौदा वडोदा शिवार मुरली ॲग्रो कंपनीचे मागे गेले असता एमएच—४०/बीएल— ६१८२ क्रमांकाच्या १० चक्का ट्रक दिसला. सदर ट्रकचे आजुबाजुला पाहणी केली असता ट्रकचा चालक व कुणीही इसम आढळुन आले नाही. सदर वाहनात २४ जनावरे कि. ३,६०,०००/—रू. निर्दयतेने मिळुन आले. त्यापैकी २ जनावरे मृत अवस्थेत आढळुन आले. वाहनासह एकुण किंमती २३,६०,०००/— रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस नाईक श्री. संजय बरोदिया, पो.स्टे. मौदा यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे वरील आरोपीविरुध्द कलम ११ (१)(ड) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम ५ अ, ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम सहकलम ४२९ भादवी काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री सोनेकर मो.क्र. ८९७५९२१७७० हे करीत आहेत.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन मौदाचे ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री हेमंतकुमार खराबे यांचे नेतृत्वात सपोनि श्री सोनेकर, पोलीस नायक संजय बरोदिया, तुषार कुडुपले व पोलिस शिपाई केशव फड यांनी यशस्वीरित्या पार पाडली.







पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर